# प्रेस नोट

दिनांक 24.12.2022

**रात्री रोडलगत उभ्या वाहनातील लोकांना चाकुचा धाक दाखवुन दरोडा टाकणारी टोळी गजाआड**

**स्थानिक गुन्हे शाखा व पो.स्टे.अमडापुर यांची संयुक्त कार्यवाही**

**3 लाख 62 हजार रूपयाचा मुदेमाल जप्त**

**बुलढाणा** :- खामगांव येथील प्रशांत अशोक वाकेकर व त्यांचे दोन मित्र असे खामगांव येथुन औरंगाबाद येथे मन्नपुरम फायनान्स कंपनीच्या मिटींग करीता दिनांक 11/12/2022 रोजी गेले होते. सदर मिटींग आटोपुन ते रात्री दरम्यान परत खामगांव कडे येत आसतांना पो.स्टे. अमडापुर हददीतील पेठ गावाचे समोर त्यांचे गाडीतील डिझेल संपल्याने त्यांनी गाडी रोडचे बाजुला उभी केली. थोडयाच वेळात 02.40 वा दरम्यान तेथे खामगांव कडुन एक स्विफ्ट डिसायर कार येवुन फिर्यादीच्या कारच्या बाजुला थांबवुन त्यामधुन चार व्यक्ती खाली उतरले व त्यांनी फिर्यादी यांचे गाडीवर हल्ला केला व गाडीचे काच फोडुन फिर्यादी व त्यांचे मित्रांना चाकुचा धाक दाखवुन त्यांचे जवळील नगदी 2500/- रुपये व एक वन प्लस मोबाईल जबरीने चोरुन नेला व आरोपी घटनास्थळावरुन पसार झाले. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. अमडापुर येथे गुन्हा नोदं होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन मा.पोलीस अधीक्षक श्री सारंग आवाड यांचे आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे चार पथके व पो.स्टे. अमडापुर येथील 1 पथक असे स्थापन करण्यात आले होते. सदर पथकांनी घटनास्थळास तात्काळ भेट देऊन घटनास्थळाकडे येण्या जाण्या रोडवरील सि.सी.टि.व्ही फुटेज हस्तगत केले. तसेच अभिलेखावरील जिल्हयातील व बाहेर जिल्हयातील आरोप तपासण्यात आले. परंतु सदरचे आरोपी हे नव्याने गुन्हेगारी क्षेत्रात पर्दापण करणारे असल्याने कोणताही धागा दोरा मिळत नव्हता. घटनास्थळाचे जवळील मिळालेल्या सिसिटीव्हीचे बारकाईन पथकरन करुन तसेच गोपनीय बातमीदाराच्या खात्रीलायक बातमीवरुन सदर गुन्हया मध्ये वापरलेल्या कारचा सुगावा लागला होता. त्याच्याच आधारे सदरचे गुन्हेगार हे जाफ्राबाद जिल्हा जालना जिल्हयातील 1. सतिष शंकर गायकवाड वय 28 वर्ष रा. सवासणी 2. परशराम सिध्दु जाधव वय 25 वर्ष रा. सवासणी 3. वैभव गजानन गावंदे वय 21 वर्ष रा. भराडखेडा 4. कृष्णा भगवान भोपडे वय 22 वर्ष रा. सोनगिरी 5. गजानन रामप्रसाद प्रसाने वय 21 वर्ष रा. डोलखेड हे असल्याचे समजले सदर दरोडयातील पाचही आरोपीतांना दिनांक 22/12/2022 रोजी विचारपुस कामी ताब्यात घेवुन सखोल विचारपुस केली असता त्यांनी गुन्हयाची कबुली दिली तसेच तपासा दरम्यान त्यांचेकडुन खालील प्रमाणे मुददेमाल जप्त करण्यात आलेला आहे.

❖ **जप्त करण्यात आलेला मुदेमाल** :

1. गुन्हयात वापरलेली एक स्विफ्ट डिझायर कार किंमती अंदाजे 3 लाख रुपये
2. आरोपीतांचे वापरलेले मोबाईल किंमती 35000/- रुपये
3. फिर्यादीचा चोरी गेलेला वन प्लस मोबाईल किंमती 25000/-
4. गुन्हयात चोरी गेलेले नगदी 2500/- रुपये असा **एकुण 3,62,500/-** रुपयाचा माल जप्त केला

❖ **अटक करण्यात आलेल्या आरोपीतांची नावे** :

1. सतिष शंकर गायकवाड वय 28 वर्ष रा. सवासणी
2. परशराम सिध्दु जाधव वय 25 वर्ष रा. सवासणी
3. वैभव गजानन गावंदे वय 21 वर्ष रा. भराडखेडा
4. कृष्णा भगवान भोपडे वय 22 वर्ष रा. सोनगिरी
5. गजानन रामप्रसाद प्रसाने वय 21 वर्ष रा. डोलखेड

सर्व आरोपी हे **जालना जिल्यातील जाफ्राबाद** तालुक्यातील आहे.

❖ **कामगिरी पथक** :-

सदरीची कामगिरी ही श्री सारंग आवाड, पोलीस अधीक्षक, बुलढाणा, श्री बी.बी महामुनी, अपर पोलीस अधीक्षक, बुलढाणा, श्री.अशोक थोरात, अपर पोलीस अधीक्षक, खामगांव, श्री बळीराम गिते, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, बुलढाणा, श्री शांतीकुमार पाटील, पोनि. पो.स्टे.सायबर, ठाणेदार पो.स्टे.अमडापुर सपोनि श्री नागेशकुमार चतरकर, सपोनि श्री. अमित वानखडे, श्री विलासकुमार सानप, श्री. मनिष गावंडे, पोउपनि श्री पांडुरंग शिंदे ,श्री श्रीकांत जिंदमवार, पोलीस अंमलदार सुधाकर काळे, सुनिल खरात, पुरूषोत्तम आघाव, दिनेश बकाले, गणेश पाटील,अनंता फरतळे, वैभव मगर, सचिन जाधव, मधुकर रगड सर्व स्थागुशा बुलढाणा, तसेच पोस्टे अमडापुर चे पोलीस अंमलदार कमलाकर देशमुख, राजेश गवई, इरफान तडवी, सायबर पोलीस स्टेशन चे पोलीस अंमलदार राजू आढवे, कैलास टोंबरे यांनी केली.

आरोपीतांना मा.न्यायदंडाकारी, चिखली येथे हजर केले असता मा.न्यायालयाने आरोपीतांचा दि.25/12/22 पोवेतो पोलीस रिमांड दिला आहे. सदर गुन्हयाचा तपास प्रभारी अधिकारी पो.स्टे.अमडापुर श्री नागेशकुमार चतरकर यांचे मार्गदर्शनात पोउपनि पांडुरंग शिंदे हे करीत आहे.

पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे शाखा, बुलढाणा

Scanned with CamScanner

